महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १९७ वा | दिनांक : २५/०५/२०२५ | वार : रविवार

## धनंजय मुंडेंना क्लीनचिट मिळाली तर मी राजीनामा देईन : छगन भुजबळ



**नाशिक :** उद्या जर धनंजय मुंडे यांना क्लीनचिट मिळाली तर आपण मंत्रिपदाचा राजीनामा देऊ, असे विधान मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे. राज्याच्या मंत्रिमंडळात नव्यानेच छगन भुजबळ यांच्याकडे मंत्रिपद देण्यात आले आहे. तसेच कॉंग्रेस जेव्हा फुटली तेव्हा मला मुख्यमंत्रीपदाची ऑफर होती, पण मी शरद पवारांसोबत गेलो, असेही भुजबळ यांनी म्हटले आहे.

एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना छगन भुजबळ यांना प्रश्न विचारण्यात आला की धनंजय मुंडे पुन्हा मंत्रिमंडळात आले तर तुम्ही काय करणार? यावर उत्तर देताना भुजबळ म्हणाले, उद्या जर धनंजय मुंडे यांना क्लीनचिट मिळाली तर आपण मंत्रिपदाचा राजीनामा देऊ. धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळात घ्यायचे ठरले तर माझी काही हरकत नाही. मी या मंत्रिमंडळात पुन्हा आलो आहे, सन्मानाने मला परत बोलावले. धनंजय मुंडे सगळ्यातून मुक्त झाले, त्यांची सगळी लाईन क्लियर झाली तर मी राजीनामा देईन.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, जेव्हा मंत्रिपद मिळाले नव्हते तेव्हा अनेक विचार येत होते आणि खंत वाटत होती. मी आणि अजितदादा बोलत नव्हतो. अजितदादांच्या घरच्या कार्यक्रमाला गेलो नाही. पण मी पक्षाच्या प्रत्येक कार्यक्रमात मी उपस्थित राहिलो, असे म्हणत भुजबळ यांनी अजित पवारांशी अबोला धरला होता असे कबूल केले आहे.

छगन भुजबळ म्हणाले, शरद पवारांनी जेव्हा अध्यक्षपदाचा राजीनामा दिला तेव्हा सुप्रियाला पक्षाचे अध्यक्ष करायचे, सरकारमध्ये जायचे असे ठरले होते. यामध्ये पवार साहेब कुठेच असणार नाहीत असेही ठरले होते. युतीची सर्व चर्चा करायला जयंत पाटील, अजित पवार आणि प्रफुल पटेल जात होते. भाजपबरोबर जावे यासाठी आमच्या अनेक बैठका झाल्या. त्यामध्ये अनिल देशमुखही होते.

छगन भुजबळ यांना दिल्लीतील महाराष्ट्र सदनमध्ये भ्रष्टाचार केल्याप्रकरणी तुरुंगात जावे लागले होते. यावर प्रश्न विचारला असता ते म्हणाले, महाराष्ट्र सदनमध्ये भ्रष्टाचार झाला नाही. महाराष्ट्र सदनाचा एकही रुपया अजूनही कंत्राटदाराला मिळाला नाही. मग भ्रष्टाचार कसा झाला? असा सवाल भुजबळ यांनी उपस्थित केला.

## मयूरी जगतापची दखल घेतली असती तर वैष्णवी जीवंत असती : रूपाली ठोंबरे

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाने महिला आयोगाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. कारण मयूरी हगवणे या थोरल्या सुनेने आधीच हगवणे कुटुंबाची तक्रार आयोगाकडे केली होती. परंतु दाखल घेण्यात आली नव्हती. यावर राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रूपाली ठोंबरे यांनी स्पष्ट मत मांडले आहे. मयूरी हगवणे (जगताप) यांची दाखल घेतली गेली असती तर आज वैष्णवी जीवंत राहिली असती, असे रूपाली ठोंबरे यांनी म्हटले आहे.

महिला आयोगाची चौकशी करावी, त्यात जर आपल्याला दिसून आले की त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केलेली आहे किंवा खरेच वेळ लागलेला आहे. कारण महिलांना न्यायाची खूप अपेक्षा आहे. हगवणे प्रकरणाच्या आधी सुद्धा मला अनेक कॉल यायचे, परंतु आता या प्रकरणानंतर कॉल येण्याचे प्रमाण वाढले आहेत, असे रूपाली ठोंबरे यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना रूपाली ठोंबरे म्हणाल्या, मला शिरूर वरून फोन येतो २० तारखेला की १५ वर्षांच्या मुलीची एफआयआर दाखल झाली आहे, अजून पोलिसांनी काही केले नाही. मला मार्केट यार्डच्या इथून कॉल आला की सोलापूरचा जो नवरा होता त्याने दीड वर्षांचे बाळ तेही पळवून नेले आहे, पोलिसांनी अजून काही केले नाही. म्हणजे एवढे प्रकार वाढत आहेत, त्याच्यावर पोलिस जर सक्षमतेने काम करत नसतील तर नागरिक बोलणार कोणाला? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

**रुपाली चाकणकरांनी अशा प्रकारची वक्तव्य टाळावीत**

नागरिक किंवा पीडिता हे सरकारकडे मागणी करणार किंवा ते यंत्रणेकडे मागणी करणार. एखाद्यावर अन्याय झाला तर ते नक्कीच पोलिसांकडे जाणार. पोलिसांच्यानंतर आयोग साक्षमतेने काम करतो म्हणून आयोगाकडे जाणार आणि जर ते काम झाले नाही तर ते तक्रार करणारच, असे रूपाली ठोंबरे म्हणाल्या. पुढे त्या म्हणाल्या, म्हणून चाकणकर जे अध्यक्ष आहेत त्यांनी अशा पद्धतीची वक्तव्य टाळावीत की ही चिल्लर आहे, हा लेखाजोखा वगैरे. जर खरेच काम केले असेल तर ते काम त्यांनी त्यांची वेगळी आयोगाची प्रेस घ्यावी, असा सल्लाही त्यांनी दिला आहे.

पुढे बोलताना रूपाली ठोंबरे म्हणाल्या, आयोगाची पूर्ण टीम त्यांच्यासोबत असेल. अध्यक्षासोबत अकरा बारा सदस्य असतात. तुम्ही काय काम केले ते दाखवून द्यावे. मी पक्षातली आहे म्हणून पक्षातले कोण चुकले आहे किंवा कोणाची बाजू मी नाही घेणार. जे सत्य आहे, जे खरे आहे कारण हा फार संवेदनशील विषय आहे. हुंडाबळी बंदच झाला पाहिजे. मयूरी हगवणेच्या बाबतीत जर त्या वेळी कडक कारवाई करण्यात आली असती, पोलिसांकडून असो किंवा आयोगाकडून असो, तर वैष्णवी आज आपल्या जगात असती. कारण फॅमिली आहे, जे मयूरीचे जे सासरे आहेत, सासू आहे, तीच वैष्णवीची आहे.

मयूरीचे कौतुक केले पाहिजे की तिला मारल्यानंतर ती राजेंद्र हगवणेच्या विरोधात पोलिस चौकीत गेली. वैष्णवी हगवणे नाही गेली. ती रडत वडिलांकडे जायची आणि म्हणायची हे द्या, ते द्या आणि वडीलही ते देत गेले. आज वैष्णवीचा बळी गेला आहे. त्यामुळे मयूरीची दखल घेण्यात आली असती तर वैष्णवी आज जीवंत असती, असे रूपाली ठोंबरे यांनी स्पष्ट मत मांडले आहे.

# राज्यात पुन्हा कोरोनाचे संकट



**मुंबई :** पुन्हा एकदा देशात कोरोनाच्या रुग्णांमध्ये वाढ होताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर अनेक राज्यांमध्ये सरकारने अलर्ट जारी केला आहे. महाराष्ट्रात देखील कोरोनाच्या रुग्णांमध्ये वाढ होताना दिसत आहे. राजधानी मुंबईमध्ये सर्वाधिक ३५ रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे आता मुंबईत आता कोरोना रुग्णांची संख्या १८५ पर्यंत पोहोचली आहे. तर ठाण्यात गेल्या तीन दिवसात १० रुग्ण आढळून आले आहेत. तर २१ वर्षीय तरूणाचा मृत्यू झाला आहे.

मुंबई महापालिकेचे आरोग्य विभाग आता सतर्क झाले असून विविध रुग्णालयांमध्ये राखीव खाटांची व्यवस्था केली जात आहे. तसेच गरज पडलीच तर आरोग्य सेवेतही वाढ केली जाणार आहे. मुंबई शहरात मे महिन्यापासून रुग्णांची संख्या झपाट्याने वाढली आहे. मात्र हे सर्व रुग्ण फ्ल्यू आणि इतर व्याधी असलेले आहेत. तसेच नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घेण्याचे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.

ठाण्यात २१ वर्षीय तरुण कोरोनाचा पहिला बळी ठरला आहे. ठाण्यातील कळवा छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात २१ वर्षीय तरुणावर गेल्या काही दिवसांपासून कोरोनावर उपचार चालू होते. मात्र उपचारादरम्यान त्याने याच रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. हा तरुण मुंब्रा येथील रहिवासी आहे. सकळी ६ वाजेच्या सुमारास त्यााच दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात गेल्या तीन दिवसात १० रुग्ण आढळून आले आहेत. या रुग्णांना कोरोनाचे सौम्य लक्षण असून त्यांच्यावर घरीच उपचार सुरू करण्यात आले आहेत. कोरोना रुग्णांच्या तपासणीसाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाने सतर्क राहावे, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. कळवा येथे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात विशेष कक्ष तयार करण्यात आला आहे. तसेच सर्व आरोग्य केंद्रात पुरेसा औषध साठा उपलब्ध असून तेथे टेस्टिंग किटही आहेत.

दरम्यान, राज्यात जानेवारी महिन्यापासून एकूण ६८१९ कोविड चाचण्या करण्यात आल्या आहेत. यापैकी २१० रुग्णांचे अहवाल पॉझिटीव्ह आले आहेत. त्यात केवळ मुंबई विभागात एकूण १८५ रुग्ण सापडले आहेत. त्यापैकी आतापर्यंत ८१ रुग्ण पूर्णपणे बरे झाले आहेत. सध्या असलेल्या सक्रिय रुग्णांमध्ये सौम्य लक्षणे असल्याने ते घरीच उपचार घेत आहेत, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २५ मे २०२५

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने शतकोत्तर ११२ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज जीवनात मानवतावादाची पाळेमुळे खोलवर रुजविण्यासाठी ते समजून, समजावून घेता यावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या प्रमाणात लिखाण करून ठेवलेले आहे.

त्यापैकी एक म्हणजे २७ मे १९५३ ला परेल, मुंबई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "मी माझ्या आयुष्याचे शेवटचे दिवस बुद्ध धर्माच्या प्रसारातच व्यतित करण्याचे ठरविले आहे." म्हणून त्या विधानाच्या ७२ व्या वर्धापनदिनानिमित्त सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ११२ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे दिनांक २५ मे २०२५, रविवारला दुपारी २:३० वाजता आयोजन करण्यात आले आहे. तरी आपण सर्व मानवतावादी विचारांच्या व्यक्तींनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जणसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक : ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. येथे उपस्थित राहावे.

या कार्यशाळेला सामाजिक कार्यकर्ते प्रकाश कांबळे हे उद्घाटनपर मार्गदर्शन करणार आहेत. तर त्रिरत्न बौद्ध महासभेचे धम्मचारी ललित सिद्धी हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. सर्व उपस्थित प्रतिनिधींना या कार्यशाळेत आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे.

तरी सर्व मानवतावादी नागरिकांनी बुद्ध जयंतीच्या पूर्व संध्येला आयोजित कार्यशाळेला उपस्थित राहून आपले म्हणणे उपस्थितांना समजावून सांगावे, पटवून द्यावे आणि इतरांचे म्हणणे समजून घ्यावे. करिता ११२ व्या शतकोत्तर वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.




## देवगाव रंगारीत गांजाचा मोठा साठा जप्त : एकाला अटक



**देवगाव रंगारी (स्वप्निल राठोड) :** स्थानिक गुन्हे अन्वेषण पथक व देवगाव रंगारी पोलिसांच्या यांनी संयुक्त कारवाई करत देवगाव रंगारी (ता. कन्नड) येथे गांजाची अवैध विक्री करणाऱ्याला गुरुवारी (२२ मे) रोजी अटक केली. त्याच्याकडून ५ किलो ६५० ग्रॅम गांजा (किंमत अंदाजे एक लाख ६९ हजार पाचशे रुपये) जप्त केला आहे.शेख नदीम शेख रौफ (वय ४७, रा. देवगाव रंगारी) असे अटक केलेल्याचे नाव आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाल्यानंतर त्यांनी देवगाव रंगारीतील आयेशानगर येथील एका पत्र्याच्या शेडवर छापा मारला. शेख नदीमकडे एका प्लॅस्टिकच्या पिशवीत गांजा आढळला.

शेख नदीमविरुद्ध देवगाव रंगारी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे देवगाव रंगारी परिसरातील अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती अन्नपूर्णासिंह यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतिष वाघ, सहायक पोलीस निरीक्षक पवन इंगळे, नामदेव सिरसाठ, जनाबाई चव्हाण, वाल्मीक निकम, शिवानंद बनगे, दीपक सुरोशे, अशोक वाघ, नीलेश कुडे, संजय तांदळे या पथकासह देवगाव रंगारी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक संदीप राजपूत, पोलीस उपनिरीक्षक रमेश चव्हाण, संजय काळे, भावसिंग जारवाल, किरण जाधव, जमील तडवी, दिलीप सोनवणे यांनी केली. त्यांना कन्नड तहसील, फॉरेन्सिक तज्ज्ञ सीताराम पळसकर, संदीप राठोड यांनी सहकार्य केले.

## महिला आयोगाने आधीच लक्ष घालयला हवे होते : नीलम गोऱ्हे



**पुणे :** वैष्णवी हगवणे प्रकरणाने महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली आहे. वैष्णवीच्या मृत्यूने महाराष्ट्रात अद्यापही हुंडाबळी सुरूच असल्याचे दिसून आले आहे. तसेच हगवणे यांच्या मोठ्या सुनेने यापूर्वीच महिला आयोगाकडे तक्रार केली होती, परंतु आयोगाकडून हवा तसा प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे महिला आयोगावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या पार्श्वभूमीवर विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी महिला आयोगाच्या कार्यपद्धतीवर भाष्य केले आहे.

विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी वैष्णवीच्या आई वडिलांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, न्याय मिळवताना पोलिस स्टेशन, कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा आणि महिलांसाठीच्या योजनांचा प्रभावी वापर व्हायला हवा. आयोगाने तज्ज्ञ आणि सामाजिक संस्थांना विश्वासात घेऊन नियमित बैठका घेणे गरजेचे आहे, असा सल्ला गोऱ्हे यांनी दिला आहे.

पुढे बोलताना नीलम गोऱ्हे म्हणाल्या, महिला आयोगाचे काम 'ट्रायल बाय मीडिया' किंवा 'ट्रायल बाय सोसायटी'च्या स्वरूपात होऊ नये. आयोगाने मयुरी जगताप यांच्या प्रकरणात कौटुंबिक हिंसाचार कायद्याचा आधार घेऊन सल्ला दिला असता, तर त्यांना त्यांच्या मालमत्तेतील वाटा मिळाला असता. पोलिसांवर दोषारोप करण्यापेक्षा पीडित महिलांची कायदेशीर साक्षरता वाढवण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे. मीडिया, महिला संघटना आणि आम्ही सर्वांनी पीडित महिलांच्या पाठीशी उभे राहायला हवे.

यावेळी बोलताना नीलम गोऱ्हे यांनी नाशिकमधील एका आत्महत्येच्या प्रकरणाचा उल्लेख करत पोलिस स्टेशनच्या असंवेदनशीलतेवर बोट ठेवले आहे. त्या म्हणाल्या, नाशिकमध्ये माडीवाले नावाच्या मुलीच्या आत्महत्येच्या प्रकरणात पोलिसांनी तक्रार नोंदवली, पण संशयित फरार आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष द्यावे, असे त्या म्हणाल्या. तसेच, काही पोलिस स्टेशनांवर आर्थिक बाहुबलाचा प्रभाव असल्याच्या तक्रारींचाही त्यांनी उल्लेख केला, सर्व पोलीस दलावर टीका करून त्यांचे मनोबल खच्ची करू नये, पण संवेदनशीलता आणि पारदर्शकता वाढवणे गरजेचे आहे, असे नीलम गोऱ्हे म्हणाल्या.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २५ मे २०२५


## उद्धव ठाकरे राज ठाकरेंच्या घरी आले तर लहान होणार नाही : प्रकाश महाजन



**मुंबई :** उद्धव ठाकरे मोठे बंधू आहेत त्यांनी राज ठाकरेंना म्हटले पाहिजे या घरी आपण चर्चा करु. उद्धव ठाकरे लहान भावाच्या घरी आले तरी मोठेच राहणार आहेत घरी गेले म्हणून लहान होणार नाही, असे प्रकाश महाजन यांनी उबाठा-मनसे युतीच्या माध्यमांमधील चर्चावर बोलताना म्हटले आहे.

प्रकाश महाजन म्हणाले की, युतीसंदर्भात प्रसारमाध्यमांशी संजय राऊत का बोलत आहेत. 'मनसे' आणि 'दिलसे' भूमिका असल्याचा त्यांनी सांगून काय दोन भावांना युती करायची त्यांना हे सर्व ठरवू द्या. संजय राऊतांनी राज ठाकरेंच्या घरी कॉफी पिण्यासाठी यावे. दरम्यान कालच राज ठाकरे यांनी ठाकरे आणि पवार ब्रँड संपवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे आता ठाकरे बंधू एकत्र येणार या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले आहे.

दिल्लीमध्ये जेव्हा-केव्हा महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार केला जातो. तेव्हा दोन आडनावे प्रकर्षाने येतात ठाकरे आणि पवार. सध्याच्या परिस्थितीत या दोन्ही आडनावांचा जो ब्रँड आहे, तो संपवण्याचा प्रयत्न चाललाय का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर बोलताना राज ठाकरे म्हणाले, ठाकरे आणि पवार हे दोन ब्रँड संपवण्याचा प्रयत्न चालला आहे, यात काही वादच नाही. पण तो ब्रँड संपणार नाही मी हे लिहून द्यायला तयार आहे. आमचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे यांचा महाराष्ट्रावर प्रभाव होता, त्यानंतर बाळासाहेब ठाकरेंचा प्रभाव होता. संगीत क्षेत्राचा विचार केला, तर माझे वडील म्हणजेच श्रीकांत ठाकरेंचा प्रभाव दिसून आला. त्यानंतर माझा प्रभाव आहे, उद्धवचा आहे. व्यक्तिगत प्रभाव असतो पण आणखी एक गोष्ट महत्त्वाची असते. ती गोष्ट म्हणजेच आडनाव ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे.

राज ठाकरे यांच्यासोबत नाते जोडणे ही उद्धव ठाकरेंची 'मनसे' आणि 'दिलसे' भूमिका असल्याचा दावा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. मराठी माणसाचे अहित होता कामा नये. मराठी माणसाच्या मनात काही इच्छा असतील, मनीषा असतील, तर त्या पूर्ण करण्यासाठी आपण मागे हटणार नाही. तीच बाळासाहेब ठाकरे यांना खरी मानवंदना ठरेल, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे.

राज ठाकरेंनी पहिली मुलाखत दिली किंवा दुसरी मुलाखत दिली म्हणून युतीचा विषय चर्चेला आला असे मी मानत नाहीत. त्याला उद्धव ठाकरे यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला. मात्र मुलाखतीवर चर्चा ठरत नाहीत. एकनाथ शिंदे आणि फडणवीस समोर आल्यानंतर फार गोड बोलतात. मात्र तशी परिस्थिती नाही. ते एकमेकांना मिठ्या मारतील, गोड बोलतील, मात्र तसेच चित्र नाही. त्यामुळे राज ठाकरे यांच्या दोन-तीन मुलाखती या पेक्षा प्रत्यक्षात काय सुरू आहे, हे आम्हाला माहिती असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे आणि शिवसेना दोघांचीही महाराष्ट्र निर्माण सेनेसोबत नाते जोडायला सकारात्मक भूमिका ठेवलेली असल्याचे ते म्हणाले. त्यामुळे कोण काय बोलत आहे? यापेक्षा ठाकरे काय बोलत आहेत? पडद्यामागे ते काय म्हणतात, हे महत्त्वाचे असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.






## महाराष्ट्राची अर्थव्यवस्था २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्सची करण्याचे उद्दिष्ट : देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** राजधानी दिल्ली येथे नीती आयोगाची बैठक पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषण केले. यावेळी त्यांनी भारतीय सैन्य दल तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ऑपरेशन सिंदूर बद्दल हृदयपूर्वक आभार मानले. तसेच मोदीजींच्या दहशतवादाविरोधात झिरो टॉलरन्सचा संकल्प यातून अधोरेखित होतो, असे ते यावेळी म्हणाले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, राष्ट्रीय धोरणानुसार, महाराष्ट्र सरकार सुद्धा महाराष्ट्र २०४७ असे व्हीजन तीन टप्प्यात तयार करीत आहे. १०० दिवसांच्या सुशासन, नागरिक केंद्रीत उपाययोजना आणि उत्तरदायित्त्व अशा सूत्रावर एक कार्यक्रम आमच्या सरकारने हाती घेतला. यात विविध विभागांनी ७०० हून अधिक उद्दिष्ट साध्य केले. आता दीडशे दिवसांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यात २०४७ साठी दीर्घकालिन, महाराष्ट्र आपला 'अमृत महोत्सव' साजरा करेल, त्या कालावधीचे म्हणजे २०३५ साठी आणि प्रतिवर्षाच्या उद्दिष्टांसह २०२९ साठीचे अल्पकालिक ५ वर्षांचे असे व्हीजन तयार करण्यात येत आहे.

विद्यमान अर्थव्यवस्था २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्स आणि २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर्सची करणे, हा आमचा मुख्य उद्देश. नवीन उद्योग धोरणाचा उद्देश जीएसडीपीत उत्पादन क्षेत्राचे योगदान २० टक्क्यांच्या वर आणणे हा आहे. मैत्री २.० ही सिंगल विंडो क्लिअरन्स प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून, ईव्ही, सेमिकंडक्टर, ग्रीन हायड्रोजन, डेटा सेंटर्स यासारख्या नवक्षेत्रांना प्रोत्साहित करण्यात येत आहे.

२०२४-२५ या पहिल्या तिमाहीत देशात सर्वाधिक १.३९ लाख कोटींची परकीय गुंतवणूक आकर्षित केली. दावोस वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये १५.९६ लाख कोटींचे सामंजस्य करार केले. त्यातील ५० टक्के प्रस्तावांवर प्रक्रिया सुरु झाली असून, त्यातील अधिकाधिक गुंतवणूक ही दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांमध्ये होत आहे.

विकासाला गती देण्यासाठी पायाभूत सुविधा, विविध सुधारणा आणि रोजगार वाढविण्यावर आमचा भर. समृद्धी महामार्ग, अटलसेतू, कोस्टल रोड आदी प्रकल्प महाराष्ट्राच्या विकासाला आणि पायाभूत क्षेत्रातील क्रांतीला गती देत आहेत. वाढवण पोर्ट, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो, रेल्वे, मल्टीमॉडेल लॉजिस्टिक पार्क हे क्षेत्रीय विकासाला चालना देणार असून, त्यासाठी आम्ही पंतप्रधान महोदयांचे आभारी आहोत.

नीती आयोगाच्या मार्गदर्शनात एमएमआर क्षेत्राला ग्रोथहब म्हणून आम्ही विकसित करीत असून, ज्यात २०४७ पर्यंत या क्षेत्राला १.५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था करणे हा उद्देश साध्य करायचा आहे. यासाठी केंद्र सरकारकडून विशेष वित्तीय मदत व्हावी, अशी अपेक्षा आहे. टीयर-२ आणि टीयर-३ शहरांमध्ये औद्योगिक विकासाला चालना देण्याच्या प्रयत्नांतून आता गडचिरोली ही स्टील सिटी, नागपूर हे संरक्षण हब, अमरावतीत टेक्सटाईल क्लस्टर, छत्रपती संभाजीनगर हे ईव्ही उत्पादन, ऑरिक सिटी तर रायगड जिल्ह्यातील दिघी येथे स्मार्ट इंडस्ट्रीयल सिटीचे निर्माण होत आहे.

राज्य सरकारने आयटी, निर्यात प्रोत्साहन, लॉजिस्टीक, एव्हीजीसी (ऑडियो-व्हीज्युअल-गेमिंग-कॉमिक्स), जीसीसी (जागतिक क्षमता केंद्र) पॉलिसीच्या माध्यमातून सेवा क्षेत्राला चालना दिली आहे. महाराष्ट्राचे ६० लाखांहून अधिक एमएसएमई उद्यम पोर्टलवर नोंदणीकृत आहे. हे देशात सर्वाधिक आहे. यासाठी 'ईज ऑफ डुईंग बिझनेस', मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम इत्यादीतून २ लाख उद्योजकांना संधी प्राप्त झाल्या आहेत.

मुंबईत 'वेव्हज' परिषदेच्या माध्यमातून दोन वैश्विक स्टुडियोंसाठी ५००० कोटींचे सामंजस्य करार झाले, मुंबईत आयआयसीटीची स्थापना, एनएसईत वेव्हज इंडेक्सचा शुभारंभ तसेच युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क आणि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया यांच्याशी करार झाले. स्टार्टअप आणि रचनात्मक प्रतिभेला चालना देण्यासाठी इनोव्हेशन सिटीचे निर्माण आम्ही करतो आहोत. उद्यमशीलता आणि रोजगाराला चालना देण्यासाठी कौशल्य विकासाच्या प्रक्रियेला अधिक सुलभ करण्यात येत आहे. एआय, हरित ऊर्जा, बायोटेक, फिनटेक, अॅग्रीटेक आणि स्मार्ट उत्पादनावर केंद्रित एक इकोसिस्टीम यातून तयार होईल.

विशेषतः ग्रामीण क्षेत्रात आयटीआयमध्ये जागतिक दर्जाचे कौशल्य प्राप्त होण्यासाठी पीपीपीला मंजुरी देण्यात आली आहे. राज्यात ४५,५०० मे.वॅ. अतिरिक्त ऊर्जा खरेदीचे करार करण्यात आले असून, यातील ३६००० मे. वॅ. ही हरित ऊर्जा आहे. २०३० पर्यंत राज्यातील ५२ टक्के ऊर्जा ही हरित स्त्रोतांतून निर्माण होईल.

मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून १० हजार कृषीफिडर्सवर १६,००० मेवॅ. क्षमतेचे प्रकल्प सुरु करण्यात आले असून, त्यातील १४०० मेवॅ. चे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. डिसेंबर २०२६ पर्यंत राज्यातील शेतीक्षेत्राला शतप्रतिशत वीज दिवसा उपलब्ध होईल आणि ती सौर प्रकल्पांतून असेल. राज्यात १०० गावांत सौरग्राम योजना सुरु असून, १५ गाव संपूर्णतः सौर ऊर्जाग्राम झालेले आहेत. पंप स्टोरेजसाठी नवीन धोरण आखण्यात आले असून, ज्यात ४५ पीएसपीसाठी विविध विकासकांसोबत १५ करार करण्यात आले आहेत. याची एकूण क्षमता ६२, १२५ मेवॅ इतकी असून, ३.४२ लाख कोटींची गुंतवणूक यातून होईल. ९६,१९० इतके रोजगार सुद्धा निर्माण होतील.

पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने सर्क्युलर अर्थव्यवस्थेला चालना देण्यात येत असून, ई वेस्ट, प्लास्टिक, टेक्सटाईल, मेटल, वाहने यासाठी विशेष रिसायकलिंग पार्क तयार केले जात आहेत. नाशिक कुंभमेळा २०२७ मध्ये असून, त्यासाठी केंद्राचे मार्गदर्शन आणि आर्थिक मदत महाराष्ट्राला मिळेलच, अशी आशा.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल मी मा. पंतप्रधान महोदयांचे मनापासून आभार मानतो. महाराष्ट्र संपूर्ण क्षमतेने विकसित भारत-२०४७ चे लक्ष्य गाठण्यासाठी केंद्र सरकार आणि सर्व राज्यांच्या सोबत 'विकास आणि विरासतचे व्हीजन' साकार करण्यासाठी तत्पर असेल.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २५ मे २०२५


## एसआयटी म्हणजे केवळ काहींना सोयीची ठरणारी समिती- अनिल गोटे



**धुळे :** धुळ्याच्या गुलमोहर शासकीय विश्रामगृहात आमदारांना देण्यासाठी ५ कोटी रुपये आणल्याचा गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल गोटे यांनी होता. त्यावरून राजकारण चांगलेच तापले आहे. अनिल गोटे यांनी ज्या खोलीत पैसे होते त्या खोलीला कुलूप लावले होते. त्यानंतर पोलिसांनी ती खोली उघडून तपासली असता एक कोटी ८४ लाख रुपये आढळून आले होते.

ही खोली शिवसेना शिंदे गटाचे आमदार अर्जुन खोतकर यांचे स्वीय सहाय्यक किशोर पाटील यांच्या नावावर बूक करण्यात आली होती. या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी गंभीर दखल घेत चौकशीसाठी समिती नेमली आहे. यावर अनिल गोटे यांनी अविश्वास व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमली आहे. यावर अनिल गोटे यांनी अविश्वास दाखवत आणखी एक गंभीर आरोप केला आहे. रोकड रकमेचे प्रकरण दडपून टाकण्याच्या उद्योगाकडे पोलिसांची वेगाने वाटचाल चालू झाली असून आतापर्यंत गुन्हा रजिस्टर न करता तपासाच्या नाटकाचा पहिला अंक पूर्ण झाला आहे. सदर प्रकरण दडपून टाकण्याची गृह खात्याचे गुप्त आदेश असल्याचा आरोप अनिल गोटे यांनी केला आहे. तसेच या कामासाठी तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांना बळीचा बकरा करण्याचे षड्यंत्र रचले जात असल्याचा दावाही गोटे यांनी केला आहे.

याप्रकरणी तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल केल्यास आपण आमरण उपोषण आंदोलन करू, असा इशारा देखील अनिल गोटे यांनी दिला आहे. अनिल गोटे यांनी एसआयटीवर देखील टीका केली आहे. एसआयटी म्हणजे केवळ काहींना सोयीची ठरणारी समिती, अशी टीका त्यांनी केली आहे. खरंच पारदर्शक चौकशी करायची असेल, तर प्रवीण गेडाम, तुकाराम मुंढे आणि धुळ्याचे माजी जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांचा समावेश असलेली स्वतंत्र आणि विश्वासार्ह समिती स्थापन करावी, अशी मागणीही गोटे यांनी केली होती.

दरम्यान, अनिल गोटे यांनी यापूर्वी जयकुमार रावल यांच्या रावल बँक प्रकरणाचा संदर्भ देत सांगितले होते की त्या वेळी सुद्धा एसआयटी स्थापन करण्यात आली होती. परंतु नंतर तपास सीबीआयकडे देण्यात आला होता. मंत्री जयकुमार रावल यांच्या विरोधात माझ्याकडे ठोस कागदोपत्री पुरावे आहेत आणि ते मी राज्यपाल, मुख्यमंत्री, देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री यांच्याकडे यापूर्वीच पाठवले आहेत. मात्र, या प्रकरणात आजवर कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्यामुळे मला या यंत्रणांवर आणि त्यांच्या चौकशीवर विश्वास राहिलेला नाही, असे अनिल गोटे यांनी म्हटले आहे.

## आम्ही दोनदा फसलो, तिसऱ्यांदा फसणार नाही

**मुंबई :** राज्याच्या राजकारणात ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीच्या चर्चेने चांगलाच जोर धरला आहे. पण मनसे नेते संदीप देशपांडे यांनी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या हेतूवर सवाल उपस्थित करत 'आम्ही दोनदा फसलो, आत्ता तिसऱ्यांदा फसणार नाही' असे ठणकावून सांगितले आहे. त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व मनसेच्या बहुचर्चित युती होणार किंवा नाही? याविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नुकतीच एका डिजिटल वाहिनीला मुलाखत दिली होती. त्यात त्यांनी युतीसंबंधीच्या आपल्या विधानाचा विपर्यास करण्यात आल्याचा दावा केला होता. संदीप देशपांडे यांनी त्यांच्या या विधानाचा दाखला देत ठाकरे गटासोबत अजून कोणताही संवाद झाला नसल्याचे स्पष्ट केले.

ते म्हणाले, आमच्या मनात युतीविषयी शंका आहे. रोज सकाळी पत्रकार परिषद घेऊन आम्ही सकारात्मक आहोत असे बोलायचे त्याला अर्थ नाही. खरेच युती करायची असेल तर ४ पाऊले पुढे आले पाहिजे. मनसेतर्फे मी सांगतो की, ठाकरे गटासोबत अजून कोणताही संवाद झाला नाही. आम्ही जे काही सुरू आहे ते केवळ संजय राऊत यांच्या पत्रकार परिषदेमार्फतच पाहत आहोत. आम्हाला जेव्हा युती करायची होती, तेव्हा आम्ही माणूस पाठवला होता. आमची जी इतर लोकांसोबत नाती आहेत, ती आहेत. आम्ही काहीच लपवत नाही.

हे लोक युतीची मुद्दाम हवा निर्माण करत आहेत. त्यांनी यापूर्वीही असेच केले होते. केवळ सकारात्मक बोलून युती होत नसते. आम्ही यापूर्वी स्वतः बाळा नांदगावकर यांना मातोश्रीवर पाठवले होते. सध्या आमच्याकडून पडद्यामागून किंवा पडद्यापुढून कोणताही संवाद सुरू नाही. आम्ही सर्वांसोबत बोलतो. शरद पवारांसोबतही आम्ही बोलतो. आत्ता आम्ही जर-तरच्या प्रश्नांना उत्तर देणार नाही. त्यांनी काय तो प्रस्ताव पाठवावा. दोनदा फसल्यावर माणूस तिसऱ्यांदा फसत नाही, असे ते म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे संजय राऊत यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना पुन्हा एकदा राज ठाकरे यांच्यासोबतच्या युतीवर भाष्य केले होते. राज ठाकरे यांनी एक मुलाखत दिली. या मुलाखतीमुळे युतीचा विषय चर्चेला आला असे मी मानत नाही. उद्धव ठाकरे यांनीही एका कार्यक्रमात त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला. पण युतीची चर्चा अशी मुलाखतीतून ठरत नाही. राज ठाकरेंच्या मुलाखतीपेक्षा प्रत्यक्षात काय सुरू आहे? हे आम्हाला माहिती आहे. उद्धव ठाकरे यांची शिवसेना, आम्ही सगळे राज ठाकरे यांच्यासोबत नाते जोडण्यास सकारात्मक आहोत, असे ते म्हणाले होते.

उद्धव ठाकरे यांची मराठी माणसासाठी सर्वकाही बाजूला ठेवून एकत्र यावे लागेल अशी भूमिका आहे. त्यांची आमच्याशी चर्चा झाली आहे. कालही आम्ही बोललो. आपण मनसेसंदर्भात सकारात्मक पाऊल टाकण्यास हरकत नाही ही पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भूमिका मनसे व दिलसे आहे. मराठी माणसासाठी एकत्र येणे हीच खऱ्या अर्थाने बाळासाहेब ठाकरे यांना मानवंदना ठरेल, असेही संजय राऊत यावेळी म्हणाले होते.

राज ठाकरे आपल्या ताज्या मुलाखतीत म्हणाले होते, मी त्या दिवशी एक वक्तव्य केले. त्याचे खूप वेगळे अर्थ काढले गेले. चुकीचे अर्थ काढले गेले. मी तेव्हा म्हटले होते की, कुठलीही भांडणे, वाद बाजूला ठेवू. माझ्यासाठी त्या भांडणापेक्षा महाराष्ट्र खूप मोठा आहे. पण त्या विधानाचे वेगळे अर्थ काढले गेले. माझे ते वक्तव्य युती किंवा आघाडीपुरते मर्यादित नव्हते. ते संपूर्ण महाराष्ट्रासाठी होते. दोन पक्ष एकत्र आले काय किंवा आघाडी झाली काय, यापेक्षा महाराष्ट्राचे काय होतंय हे सर्वात महत्वाचे आहे. राज्यातील शेतकरी आत्महत्या थांबल्या नाहीत. ते सर्वात आधी थांबले पाहिजे.

## प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे समाजरत्न पुरस्काराने सन्मानित



**पाचोड :** धुळे येथे आयोजित केलेल्या श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्था आणि इंडो ग्लोबल व्हिजन सोशल डेव्हलपमेंट गुरुकुल फौंडेशनतर्फे दिला जाणारा राष्ट्रीय सन्मानाचा समाजरत्न पुरस्कार २०२५ पाचोड येथील शिवछत्रपती कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांना धुळे येथील श्री शिवाजी विद्या प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सभागृहामध्ये मानचिन्ह व मानपत्र देऊन सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

रियल इंडो ग्लोबल व्हिजन सोशल डेव्हलपमेंट गुरुकुल फौंडेशनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मनोहर पाटील, सचिव प्रा. डॉ. संभाजी पाटील, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. प्रमोद पवार, श्री शिवाजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बापूसाहेब सिसोदे, सहसचिव डॉ. मोहन पावरा यांच्या शुभहस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

मत्स्योदरी शिक्षण संस्थेत प्रदीर्घ सदतीस वर्षे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून उत्तम सेवा बजावलेले डॉ. चंद्रसेन कोठावळे हे मागील तीन वर्षांपासून पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून यशस्वीपणे कार्य करत आहेत. मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. खा. अंकुशराव टोपे व मा. पालकमंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते डॉ.. चंद्रसेन कोठावळे यांना मत्स्योदरी सेवा गौरव पुरस्कारही प्रदान करण्यात आलेला आहे. गत चाळीस वर्षाच्या सेवेच्या काळात उत्तम अध्यापन, विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास, करिअर मार्गदर्शन, रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, जलसंवर्धन, मतदान जनजागृती अभियान इ. उपक्रम राबवून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा कुणबी आरक्षणाच्या समर्थनार्थ महाराष्ट्र न्यूज चॅनलवर महाचर्चेमध्ये सातत्याने अभ्यासपूर्ण भूमिका मांडलेली आहे.

प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांना यापूर्वी मुंबई येथील मनुष्यबळ लोकविकास अकॅडमीतर्फे उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, अहमदाबाद येथील ग्लोबल मॅनेजमेंट कौन्सिलचा राष्ट्रीय आदर्श प्राचार्य पुरस्कार, उच्च व तंत्रशिक्षण विभाग (म.रा.)आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र (कोल्हापूर) यांचे तर्फे दोन वेळा राज्यस्तरीय (पन्नास हजाररू. रोख पारितोषिक) उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, संभाजीनगर येथील सामाजिक व सांस्कृतिक पुनरूत्थान महासंघामार्फत स्नेहलता मारूतीराव पाटील जीवन गौरव पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री ज्ञानेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी शिक्षण संस्थेचे सचिव तथा संभाजीनगरचे खा. संदीपान पाटील भुमरे, पैठणचे आमदार विलास बापू भुमरे, सचिव राजूनाना पाटील भुमरे, पाचोडचे सरपंच शिवराज पाटील भुमरे यांनी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. कोठावळे यांचे अभिनंदन केले आहे. उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव, डॉ. सुरेश नलावडे, श्री. सतीश वाघ, डॉ. संतोष चव्हाण, डॉ. गांधी बानायत, डॉ. हरिप्रसाद बिडवे, डॉ. सुभाष पोटभरे, डॉ. विलास महाजन आदी प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी वर्तुळातूनही प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.टी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com